N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** नवघर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0018 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/01/2020 03:37 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 17/01/2020
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/01/2020
   **Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/01/2020 **Time (वेळ):** 03:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/01/2020 03:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 03 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** चंद्रा को औ हौ सोसायटी,बिल्डींग नं1 च्या पँसेज मध्ये,गोल्डन नेस्ट, फेस-3 मिरारोड पु

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.तपन विभूती दत्ता
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1956 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा601/ए-1,गोल्डन नेस्ट, फेस-3,चंद्रा को आपसोसायटी बिल्डंग ,मिरा रोड पुर्व जिल्हा-ठाणे, नवघर,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा601/ए-1,गोल्डन नेस्ट, फेस-3,चंद्रा को आपसोसायटी बिल्डंग ,मिरा रोड पुर्व जिल्हा-ठाणे, नवघर,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9821701486**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रायर पेरीयन | | | 1. रूम नं 16,भोलानगर चाळ, स्मषानाजवळ, षंकर मर्दीराजवळ,भाईंदर प ताजि ठाणे,भायंदर,ठाणे ग्रामीण , महाराष्ट्र,भारत |
| 2 | खाजगी इसम बाबू राजेंद्रन | | | 1. रूम B/27,स्मषाना जवळ,षंकर मर्दीराजवळ,भाईंदर प ता जि ठाणे, भायंदर,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि 18/01/2020 मी श्री.तपन विभूती दत्ता वय-64 वर्शे रा.601/अ◌े-1,गोल्डन नेस्ट, फेस-3, चंद्रा को आप.सोसायटी बिल्डंग नं. 1, मिरा रोड (पुर्व) जिल्हा-ठाणे, मोबाईल नंबर- 9821701486 समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असून वरील नमुद पत्त्यावर माझे कुंटुबासोबत राहत असून मी सेवानिवृत्त आहे, तसेच सदर सोसायटीचा मी अध्यक्ष आहे. आमचे परीसरामध्ये सध्या पाण्याची मोठी समस्या असून सदर समस्येवर तोडगा काढण्यासाठी मिरा भाईंदर महानगर पालिकेने नविन पाण्याची लाईन टाकण्याचे काम चालू केल्याचे मला समजले. त्याअनुशंगाने आमचे सोसायटीस दिनांक 03/01/2020 रोजी महानगर पालिकेने पाठविलेली नोटीस ही दिनांक 10/01/2020 रोजी मिळाली. त्या नोटीस मध्ये एका पाईपलाईन साठी 500/- रूपये आकारण्यात येणार असलेबाबतची माहिती त्यात नमूद होती. तसेच आमचे सोसायटीत 3 पाईपलाईन असल्याने आम्हाला त्या अनुशंगाने 1500/- रूपये भरण्याचे सुचीत केले होते. त्याप्रमाणे जर आम्ही 1500/- रूपये भरले तर आम्हांला नविन पाण्याचे कनेक्षन मिळणार होते, त्यामुळे मी सोसायटीच्या वतीने दिनांक 13/01/2020 रोजी नविन पाईप लाईन कनेक्षकरीता 1500/- रूपये महापालीकेत भरले असून त्याबाबत मला 132354 या क◌्रमाकांची पावती महापालीकेकडून मिळाली आहे, सदरवेळी मला महानगरपालिके तर्फे त्यांचा एक कर्मचारी श्री रायर पेरीयन यांचेषी संपर्क साधण्यास सांगितले, त्याप्रमाणे मी श्री. पेरीयन यांचेषी त्याचदिवषी संपर्क साधला असता श्री पेरीयन यांनी नविन पाईप लाईन जोडणीकरीता माझेकडे 8500/- रूपयाची लाचेची मागणी केली. सदरची रक्कम न दिल्यास तुमचे काम करणार नाही, असे सांगितले, सदर रक्कमेची पावती मिळणार का? असे विचारल्यावर पावती मिळणार नाही असे श्री. पेरीयन यांनी त्यावेळी सांगितले. मी जर त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम दिली नाही तर ते आमचे सोसायटीत नविन पाण्याची पाईप लाईन टाकून देणार नाही. तरी मला श्री. रायर पेरीयन यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांचे विरुध्द कारवाई होणेसाठी अन्टी करप्षन ब्युरो ठाणे येथे मी दिनांक 15/01/2020 रोजी माझे स्वःहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली होती. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 16/01/2020 रोजी पोउपअधी श्री. चांदेकर यांनी दोन पंच साक्षीदार समक्ष कायदेषीर बाबींचा अवलंब करून मला डिजीटल व्हाईस रेकार्डर लावून पंच साक्षीदार नं. 1 यांचेसह लोकसेवक पेरीयन यांना भेटण्याकरीता जाण्याआगोदर फोन केला असता लोकसेवक श्री. पेरीयन यांनी त्य◌ंाचा पोंगल सण असल्याने ते उदया षुक्रवारी येवुन भेटतील असे सांगितले. त्यानंतर पोउपअधी



Scanned by CamScanner

श्री. चांदेकर यांनी लोकसेवक यांचेकडे उदया दिनांक 17/01/2020 रोजी पडताळणी करण्यात येईल असे सांगितले. दिनांक 17/01/2020 रोजी पोउपअधी श्री. चांदेकर यांनी दोन पंच साक्षीदारसह माझे घरी येवुन कायदेशीर बाबींचा अवलंब करून मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच साक्षीदार नं. 1 यांचेसह लोकसेवक पेरीयन यांना भेटण्याकरीता जाण्याआगोदर फोन केला असता लोकसेवक पेरीयन यांनी ते मोटार सायकल चालवित आहेत असे सांगून फोन कट केला. त्यानंतर अर्धातास श्री. पेरीयन यांच्या फोनची वाट पाहून मी पुन्हा त्यांना फोन केला असता पेरीयन यांनी फोन उचलून, और 15 मिनिट लगेगा असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने श्री. पेरीयन यांनी मला फोन करून, मी खाली आलो आहे खाली या असे सांगितले. त्यानंतर पोउपअधी श्री. चांदेकर यांचेसुचने वरून मला डिजीटल व्हाईस रेकार्डर लावून दिल्यानंतर पंच साक्षीदार नं. 1 यांचेसह लोकसेवक पेरीयन यांना भेटलो. सदर वेळी पंच नं. 1 यांची ते सोसायटीचे ट्रेझरर अशी लोकसेवक रायर पेरीयन याना ओळख करून दिली. तसेच पाणी कनेक्षनकरीता जे काही आहे ते यांना सांगा असे सांगितले असता लोकसेवक पेरीयन यांनी पाणी कनेक्षन करीता हम दस-दस हजार में काम करता है, मैने आपको 8500/-बोला, अभी आपने 1500/- रूपये पाहिलेसे ही भरा है, तो वो रक्कम काटकर बची हुई 8500/- रूपये होता है असे सांगितले. त्यावेळी मी काही कमी करा अशी विंनंती श्री. पेरीयन यांना केली असता त्यांनी, एक पैसा ज्यादा नही लिया है असे सांगितले. त्यावेळी मी ठिक आहे मला अर्धा तासाचा वेळ दया असे सांगितले असता लोकसेवक पेरीयन यानी ठिक आहे असे बोलून निघून गेले. सदर पडताळणीचे वेळी पेरीयन यांनी माझेकडे 8500/-रूपये लाचेची मागणी केल्याचे निशपन्न झाले. लोकसेवक श्री. पेरीयन यांनी माझेकडे 8500/-रूपये लाचेची रक्कम मागणी केल्याने व मी अर्धा तासाचा वेळ मागून घेतल्याने पोउपअधी श्री. चांदेकर यांनी पुढील सापळा कारवाई लागलीच करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे मी हजर केलेली लाचेची रक्कम त्यात 500 रूपये दराच्या 17 चलनी नोटा असे एकूण 8500/- रूपयांना अॅथ्रासीन पावडर लावून कायदेशीर बाबींचा अवलंब करून लाचेची रक्कम माझ्या कुर्त्याचे डावे खिषात ठेवुन दिल्यानंतर सापळा कारवाई चंद्रा को आ.सोसा बिल्डिंग नं. 1 च्या परोज मध्येच आयोजित करण्यात आली. लोकसेवक पेरीयन हे सदर ठिकाणी आणखी एका इसमा सोबत आल्यावर मी पेरीयन याना माझे कामाबाबत बोलणी करून मला पावती मिळेल का? याबाबत विचारणा केली असता पेरीयन यांनी एक उसका लेटर ओ देगा उसमे लिख के असे बोलून त्यांनी त्यांचे हाताची बोटे ऐकमेकांवर घासुन माझेकडे पैषाची मागणी केली. त्यावेळी मी कुर्तीचे डावे खिषात अन्थ्ाराासिन पावडर लावुन ठेवलेली लाचेची रक्कम पेरीयन यांचे समोर धरली असता पेरीयन यांनी सदरची रक्कम सोबत आलेल्या इसमास देण्यास सांगितली. सदरवेळी मी, तुम्ही घ्या ना, तुमच्यायी बोलणी झाली आहे. तुम्हीच घ्या असे सांगितले पेरीयन यानी तुम्ही त्याच्या कडेच दया. तो माझा जावाई आहे. तोच काम करतो, त्यांचेकडेच दया असे सांगितल्याने मी सदरची लाचेची रक्कम श्री पेरीयन यांचेसोबत आलेल्या इसमास दिली असता सदर इसमाने लाचेची रक्कम स्विकारली. त्यावेळी मी त्यांना, गिन लो असे सांगितले असता, त्यांनी सदर लाचेची रक्कम ही मोजून घेतली. त्याचवेळी मी, लोकसेवक यांनी लाच स्वीकारले बाबत सापळा पथकास माझे उजवा हात डोक्यावरून फिरवुन पुर्वनियोजित ठरल्याप्रमाणे इषारा केला. त्यावेळी सापळा पथकाने पेरीयन व त्याचे सोबत असलेला इसम यांना 14:29 वाजता पंचासमक्ष रंगेहाथ पकडले आहे. सदरवेळी पोउपअधी श्री. चांदेकर यांनी श्री. पेरीयन व त्यांचेसोबत असलेला इसम यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपली नावे श्री. रायर पेरीयन, वय. 52 वर्षे, व्यवसाय- फिटर, मिरा भाईंदर महानगरपालिका, जि-ठाणे, राहणार- भोलानगर चाळ रूम नं. 16, स्मषानाजवळचे पंकर मर्दीराजवळ भाईंदर (प) व 2) बाबू राजेंद्रन वय 25 वर्शे खाजगी इसम रा. भोलानगर चाळ रूम नं., बी/27 स्मषानाजवळ भाईंदर (प) असे सांगितले. सदरबाबत तसा सविस्तर पडताळणी, सापळा पुर्व व सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे. तरी यातील 1) लोकसेवक श्री. रायर पेरीयन, वय. 52 वर्षे, व्यवसाय- फिटर, मिरा भाईंदर महानगरपालिका, राहणार- भोलानगर चाळ रूम नं. 16, स्मषानाजवळ, पंकर मर्दीराजवळ भाईंदर (प) यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन आमचे सोसायटीस नविन पाण्याची पाईपलाईनची जोडणी करून देण्याकरीता माझेकडे 8500/- रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आरोपी नं. 2खाजगी इसम बाबू राजेंद्रन वय 25 वर्शे रा. भोलानगर चाळ रूम नं. बी/27, स्मषाना जवळ, पंकर मर्दीराजवळ, भाईंदर (प) याचे मार्फतीन लाचेची रक्कम स्विकारून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतला. तसेच बाबु राजेंद्रन याने लाचेची रक्कम स्विकारुन लोकसेवक पेरीयन यांनी केलेल्या कृत्यास प्रोत्साहन दिले आहे म्हणून माझी त्यां दोघांविरुध्द फिर्याद आहे. माझी फिर्याद मराठीत लपटापवर टंकलिखित करण्यात आली असून ती मला मराठीत वाचून दाखविली, तसेच ती मला हिंदीत समजावून सांगितली. ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ही फिर्याद लिहून दिली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): prakash nagappa birajdar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned by CamScanner

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** prakash nagappa birajdar

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

ठाणे अंमलदार

खबर पोलीस स्टेशन,

Scanned by CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned by CamScanner